DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51;

4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 02.05.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांक:- /05/2020.

**विषय:- उस्मानाबाद जिल्हांतर्गत राज्य परिवहन महामंडळाची बस सेवा लॉकडाऊनचे कालावधीत बंद ठेवणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 17 मे 2020 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. यातील मुद्दा क्र. 9 (ii) नुसार ग्रीन झोन मध्ये बसमधील बैठक व्यवस्थेच्या 50 टक्के इतक्या क्षमतेने बस सुरु करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच बसेसद्वारे फक्त ग्रीन झोनमध्येच प्रवाशी वाहतूक करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळणे, वैद्यकीय निकषानुसार निश्चित केलेले सामाजिक अंतराचे पालन करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी सद्यस्थितीत उस्मानाबाद जिल्हा हा ग्रीन झोनमध्ये असून उस्मानाबाद जिल्ह्याच्या सीमांलगत असलेले जिल्हे हे रेड व ऑरेंज झोनमध्ये आहेत. त्यामुळे जिल्ह्यात राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस सुरु केल्यास या बसेस फक्त उस्मानाबाद जिल्ह्यातच प्रवाशांची वाहतूक करु शकतील.



Scanned by CamScanner

तसेच बसेस सुरु केल्यामुळे जिल्ह्यातील बस स्थानकांवर फार मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव होऊ नये याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून सद्यस्थितीत दि. 17.05.2020 पर्यंत लॉकडाऊनचे कालावधीत उस्मानाबाद जिल्हांतर्गत राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसची वाहतूक सुरु करणे आवश्यक नसल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त अधिकारांनुसार करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता लॉकडाऊनच्या कालावधीत **उस्मानाबाद जिल्हांतर्गत राज्य परिवहन महामंडळाची बस सेवा सुरु करण्यात येऊ नये** असे आदेशीत करीत आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांका पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रति,**

**विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
4. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
5. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
6. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
8. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

5/5/20

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner